नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०५/२०२६ (गुरूवार )

---

# अल्पवयीन बालीकेवर बलात्कार करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

**पोलीस स्टेशन देवलापार** :— गुन्ह्याची हकीकत अशा प्रकारे आहे की, पो.स्टे. देवलापार हद्दीतील महिला फिर्यादी हिच्या अल्पवयीन पिडीत मुलीला आरोपी नामे पंकज गजानन लाडे वय २० वर्षे रा. हिवरा बाजार, ता. रामटेक जि. नागपूर याने फिर्यादि यांचे कायदेशिर रखवालीतून पळवून नेवून फिर्यादि सोबत जबरी संभोग केले, त्यामुळे फिर्यादि ची अल्पवयीन मुलगी ही गर्भवती झाली. फिर्यादि यांनी पो.स्टे. देवलापार येथे दिलेल्या तक्रारीवरून आरोपीविरूध्द आधी कलम ३६३,३६६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला व गुन्ह्याच्या तपासात आरोपीने पीडीत मुलीवर लैंगीक अत्याचार करून तीला गर्भवती केल्याने सदर गुन्ह्यात कलम ३७६(२)(एन), ३७६(३) भादंवि सहकलम ४,६ पोक्सो प्रमाणे कलम वाढ करून गुन्ह्याचे **तपासी अधिकारी श्रीमती वर्षा मते, सहायक पोलीस उपनिरीक्षक, नेमणुक — पोलीस स्टेशन देवलापार** यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ साक्ष पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले.

**दिनांक २१/०५/२०२६ रोजी पोक्सो विशेष न्यायालयाचे मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं. १२, श्री. ए. ए. कुळकर्णी यांनी आरोपी नामे पंकज गजानन लाडे वय २० वर्षे रा. हिवरा बाजार, ता. रामटेक जि. नागपूर यास कलम ३७६(२)(जे)(एन)(एफ) भादंवि तसेच कलम ६ पोक्सो मध्ये सिध्द दोषी करार करून कलम ६ पोक्सो मध्ये २० वर्ष सश्रम**

**कारावास व २५,०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०१ वर्ष कारावास, अशी शिक्षा सुनावली आहे.**

**मा. न्यायालयात सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती रश्मी खापर्डे** यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री. रमेश बरकते, उपविभागिय पोलीस अधिकारी, रामटेक उपविभाग, सहायक पोलीस निरीक्षक श्री. नारायण तुरकुंडे, ठाणेदार, पोलीस स्टेशन देवलापार , पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, सपोनि श्री विशांत नांदगाये, मपोशि निलीमा ईनवाते, ब.नं २१८२, नेम. दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण आणि **पोहवा इमरान शेख, ब.नं १९९०, नेम. पोलीस स्टेशन देवलापार** यांनी महत्वपुर्ण योगदान दिले.

## अवैधरित्या नदीपात्रातून उपसा करून रेतीची चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूध्द पो.स्टे. जलालखेडा येथे गुन्हा नोंद (३ ट्रक्टर व टालीसह एकूण २१ लाख २२ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त) स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**स्थानिक गुन्हे शाखा** :— दिनांक २०/०५/२०२६ रोजी पो.स्टे. जलालखेडा हद्दीत पेट्रोलींग वर असलेल्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा सायवाडा शिवारातुन जाणा—या वर्धा नदीचे पात्रातुन अवैधरित्या उपसा करून ट्रॅक्टर मधून रेती चोरी केली जात आहे. मिळालेल्या माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकानी तात्काळ पंचासह घटनास्थळी जावुन पाहणी केली असता काही इसम नदिपात्रातून रेतीचे उपसा करून विना क्रमांकांचे तीन ट्रॅक्टर मध्ये रेती भरत असल्याचे दिसले, सदर इसमांना रेती उपसा करण्याचा परवाना/रॉयल्टी बाबत विचारले असता त्यांचे कडे कुठलीही रॉयल्टी नसल्याचे सांगितले.

करिता घटनास्थळावरून पंचासमक्ष १) विना नंबरचा महिंद्रा कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली किं.अं. ७,००,०००/— रू. २) विना नंबरचा सोनालीका कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली क्रं. एम. एच.२७/बी.झेड. ६३४९ किं.अं. ७,००,०००/— रू. ३) विना नंबरचा न्यु हॉलंड कंपनीचा ट्रॅक्टर व ट्रॉली किं.अं. ७,००,०००/— रू. ४) तीन्ही ट्रॅक्टर मध्ये मिळून आलेली एकूण

०२ ब्रास रेती किं. १०,०००/— रू. आणि ५) रेतीचा उपसा करण्यासाठी वापरलेले फावडे, टोपले, चाळणी इ. साहित्य किं.अं. १२,०००/— रू. असा एकूण किं.अं. २१,२२,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वरील नमूद **अनु.क्रं. १ च्या वाहनाचा** आरोपी मालक नामे शुभम हरीभाउ आघव वय ३० वर्ष व गाडी चालक राकेश हरीभाउ आघव वय २८ वर्ष दोन्ही रा. गाडेगाव, वार्ड क. २, ता. वरूड जि. अमरावती, **अनु.क्रं. २ च्या वाहनाचा** आरोपी चालक/मालक नामे जाहीद अली इनायत अली खान पठाण वय ४९ वर्ष रा. वार्ड क्रं. २ मु. वाघाळ पोस्ट — गाडेगाव ता. वरूड जि. अमरावती, **अनु.क्रं. ३ च्या वाहनाचा** आरोपी चालक/मालक नामे हर्षल उर्फ रामेश्वर प्रमोद कडु वय २२ वर्ष रा. गाडेगाव ता. वरूड जि. अमरावती यांचे विरूध्द पोलीस स्टेशन जलालखेडा येथे कलम ३०३(२), ४९ भा.न्या.सं, अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



# अनैतिक देहव्यापार करणाऱ्या आरोपीवर — पो.स्टे. सावनेर येथे गुन्हा नोंद (पो.स्टे. सावनेर ची कारवाई)

**पोलीस स्टेशन सावनेर :—** दिनांक २०/०५/२०२६ रोजी सावनेर पोलीसांना पो.स्टे. सावनेर हद्दीतील एस.पि.हॉटेल कॅफे अॅड लॉज पाटनसावंगी, सावनेर येथे आरोपी नामे १) सौरभ दिलीप राउत वय २४ वर्ष रा. दहेगाव रंगारी ता. सावनेर , २) शौलेश शेटे दहेगाव रंगारी ता. सावनेर, ३) आकाश ठाकरे रा. सौसर (म.प्र) आणि ४) मुन्ना शिरके रा. कोराडी नागपुर हे स्वत:च्या आर्थिक फायद्यासाठी पिडीत महिलांना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून अनैतिक देहव्यापार करत असल्याची गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशिर माहिती मिळाल्याने सावनेर पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळ एस.पि.हॉटेल कॅफे अॅड लॉज पाटनसावंगी, सावनेर येथे धाड टाकली असता नमूद आरोपी स्वत:च्या आर्थिक फायदया करीता व कुंटनखाण्याच्या कमाईवर स्वत:ची उपजिविका चालविण्यासाठी ग्राहकांकडून पैसे घेवून पिडीत महिलेकडून देहव्यापार करित असल्याचे समक्ष मिळून आल्याने **आरोपी नामे १) सौरभ दिलीप राउत वय २४ वर्ष रा. दहेगाव रंगारी, ता. सावनेर , २) शैलेश शेट्टे रा. दहेगाव रंगारी ता. सावनेर, ३) आकाश ठाकरे रा. सौसर (म.प्र) आणि ४) मुन्ना शिरके रा. कोराडी ता. कामठी जि. नागपूर** यांना ताब्यात घेतले व पिडीत महिलेची सुटका केली. तसेच आरोपीतांकडून व गुन्हयाच्या घटनास्थळावरून १) एकूण ८ नग एन्ड्रॉईड मोबाईल फोन प्रत्येकी कि. १०,०००/— रू. प्रमाणे एकूण कि. ८०,०००/— रू, २) रजिस्टर ३ नग कि. ३००/— रू. ३) सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्याचे डि.व्ही.आर. कि. १०,०००/— रू. आणि ४) आरोपींच्या अंगझडतीत नगदी रू. ३,१००/— रू. असा **एकुण किंमती ९३,४००/— रु. चा मुद्देमाल जप्त** करून आरोपीतांविरूध्द पो.स्टे. सावनेर येथे **अप. क्रं. ५५०/२६ कलम ३(२)(अ), ५(१)(क), ५(१)(ख), (५)(१)(ग), ५(१)(घ) पिटा अॅक्ट स्त्रीया व मुली अनैतीक व्यापार प्रतीबंध अधि १९५६ सहकलम ३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.**

# अंमली पदार्थाचे सेवन करणाऱ्या आरोपीविरूध्द एन.डी.पी.एस कायदयान्वये गुन्हा नोंद

पोलीस स्टेशन रामटेक :— दि. २०/०५/२०२६ रोजी पो.स्टे. रामटेक अंतर्गत रामटेक पोलीस पंचासह पेट्रोलींग करीत असतांना आरोपी नामे **विजय श्रीराम बोंद्रे वय ४६ वर्ष रा गांधी वार्ड रामटेक** हा **मौजा** तहसिल कार्यालय परिसर, रामटेक येथे सार्वजनिक ठिकाणी अंमली पदार्थ गांजा चिलमीत भरून सेवन करतांना मिळुन आला. नमूद आरोपीकडून पंचासमक्ष अंमली पदार्थ गांजा सेवन करण्याचे साहित्य जप्त करून त्याचेविरूध्द कलम २७ एन.डी.पी.एस. ॲक्ट प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

## जुगार खेळणाऱ्या आरोपींवर नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई (५ आरोपीतांविरूध्द एकूण ५ गुन्हे नोंद व २५२८— रू. चा माल जप्त)

पोलीस स्टेशन रामटेक :— दिनांक २०/०५/२०२६ रोजी पो.स्टे. रामटेक पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सट्टापट्टी लिहून जुगाराचा खेळ चालविणाऱ्या आरोपीवर पोलीसांनी **मौजा कांद्री माईन** या ठिकाणी पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **संदिप रामफल टेकाम वय २७ वर्ष रा. मनसर , वार्ड क्र. ०२, रामटेक** हा ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्टापट्टीचे आकडे लिहून खायवाडी करतांना व **जुगाराचा** खेळ चालवितांना प्रत्यक्ष मिळून आला. **आरोपीच्या ताब्यातून सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागद, निळ्या शाईचा बॉल पेन किं. अं. ०५/— रू. आणि नगदि २७३/— रू. असा एकूण किं. २७८/— रू. चा माल जप्त करण्यात आला** असून आरोपीविरूध्द पो.स्टे. रामटेक येथे **कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

पोलीस स्टेशन पाचगाव :— दिनांक २०/०५/२०२६ रोजी पो.स्टे. पाचगाव पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सट्टापट्टी लिहून जुगाराचा खेळ चालविणाऱ्या आरोपीवर पोलीसांनी **मौजा बिरसा नगर, कुही फाटा** या ठिकाणी पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे अशोक प्रल्हाद तिडके वय ५२ वर्ष रा. बिरसा

नगर कुहि फाटा ता.उमरेड जि.नागपुर हा ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्टापट्टीचे आकडे लिहून खायवाडी करतांना व **जुगाराचा** खेळ चालवितांना प्रत्यक्ष मिळून आला. **आरोपीच्या ताब्यातून सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागद, निळ्या शाईचा बॉल पेन किं. अं. ०५/— रू. आणि नगदि ५६०/— रू. असा एकूण किं. ५६५/— रू. चा माल जप्त करण्यात आला** असून आरोपीविरूध्द पो.स्टे. पाचगाव येथे **कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.**

**पोलीस स्टेशन बुटीबोरी :—** दिनांक २०/०५/२०२६ रोजी पो.स्टे. बुटीबोरी पोलीसांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे सट्टापट्टी लिहून जुगाराचा खेळ चालविणाऱ्या आरोपीवर पोलीसांनी **मौजा बोरखेडी रेल्वे, मौजा रूइखैरी शिवार आणि मौजा बुटीबोरी शिवार** अशा वेगवेगळ्या तीन ठिकाणी पंचासमक्ष धाड टाकली असता आरोपी नामे **१) अमर ज्ञानेश्वर मानकर वय ४४ वर्ष रा.बोरखेडी रेल्वे, २) समीर अनवर शेख वय ३८ वर्ष रा. जुनी वस्ती वार्ड क्र ०१ बुटीबोरी आणि ३) आशुतोष ज्ञानेश्वर शेंडे वय ३३ वर्ष रा. फेन्डस कॉलनी बुटीबोरी हे** ग्राहकांकडून पैसे स्विकारून सट्टापट्टीचे आकडे लिहून खायवाडी करतांना व **जुगाराचा** खेळ चालवितांना प्रत्यक्ष मिळून आले. सदर तीन्ही आरोपींच्या ताब्यातून **सट्टापट्टीचे आकडे लिहीलेले कागद, निळ्या शाईचे एकूण ३ बॉल पेन किं. अं. २५/— रू. आणि नगदि १,६६० /— रू. असा एकूण किं. १६८५/— रू. चा माल जप्त करण्यात आला** असून आरोपींविरूध्द पो.स्टे. बुटीबोरी येथे **कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंध कायद्यान्वये एकूण ३ गुन्हे नोंद करण्यात आलेले आहेत.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या (१४ आरोपीतांविरूद्ध १४ गुन्हे नोंद)

दिनांक २०/०५/२०२६ रोजी नागपूर ग्रामीण जिल्हयातील विविध पोलीस अंतर्गत महाराष्ट्र दारूबंदी कायदा अन्वये पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी/विदेशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण **८,५६०/—** रूपयांचा मुद्‌देमाल

जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण **१४** गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन अरोली** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे उत्तम श्रावण चौधरी वय ६७ वर्षे रा.भांडेवाडी टोली, ता. मौदा याचे विरूध्द १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. ४४०/— ची देशी दारू जप्त, **पोलीस स्टेशन रामटेक** येथे अवैधरित्या विदेशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे प्रशांत मिताराम परतेती वय ३५ वर्षे रा. गुगलडोह ता. रामटेक जि. नागपुर याचे विरूध्द १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. १५२०/— ची विदेशी दारू जप्त, **पोलीस स्टेशन भिवापूर** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे कवडुजी रामप्रसाद पवार वश ६० वर्ष रा वासी शेत शिवार ता. भिवापुर याचे विरूध्द १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. ३२०/— ची देशी दारू जप्त , **पोलीस स्टेशन खापा** येथे दारूचे सेवन करून सार्वजनिक ठिकाणी धामधूम करणारे आरोपी नामे १) राजु लक्ष्मण उईके वय ४६ वर्ष रा.आदासा, वार्ड नं.०२ ता. कळमेश्वर जि. नागपुर व २) प्रविन गजानन राऊत वय २७ वर्ष रा.वार्ड नं.०१ आदासा ता. कळमेश्वर जि. नागपुर यांचे विरूध्द प्रत्येकी १ गुन्हा असे ०२ गुन्हे नोंद **पोलीस स्टेशन कळमेश्वर** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपीनामे कैलास राजय्या बंडीपेल्लीवार वय ४२ वर्ष रा. पारडी देशमुख त. कळमेश्वर जि. नागपूर याचे विरूध १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. १२००/— ची देशी दारू जप्त. **पोलीस स्टेशन केळवद** येथे दारूचे सेवन करून सार्व ठिकाणी धामधूम करणारे आरोपी नामे १) जयभारत भगवाण बागडे वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ०२, मंगसा, ता. सावनेर २) विलास रामराव गजभीये वय ४८ वर्ष रा. वार्ड क्र. ०३, मंगसा, ता. सावनेर व ३) इंद्रजीत वामनराव बांबोडे वय ४० वर्ष रा. वार्ड क्र. ०३, रामपूरी, ता. सावनेर यांचे विरूध्द प्रत्येकी १ गुन्हा असे एकूण ३ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन मौदा** येथे दारूचे सेवन करून सार्वजनिक ठिकाणी धामधूम करणारा आरोपी नामे भाउराव गोमजी मारबते वय४५ वर्ष रा. ढिवर मोहल्ला, मौदा याचे विरूध्द ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन बुटीबोरी** येथे अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगून विक्री करणारे आरोपी नामे १) नविनकुमार विश्वनाथ प्रसाद राय वय ३८ वर्ष रा. लावापुर महनार, जि. वैशाली, बिहार ह.मु. बोरखेडी रेल्वे, २) विश्वास गजानन आडे वय

३९ वर्ष रा. राणी दुर्गावती नगर मेन रोड, पोस्ट आफीस जवळ, वर्धा जिल्हा वर्धा ३) मुरलीधर तुकोडोजी मसराम राय वय ३२ वर्ष रा. पादरी ठाणा, ता. उमरेड जि. नागपुर, यांचे विरूध्द प्रत्येकी १ असे एकूण ३ गुन्हे नोंद व रू. ४०८०/— ची देशी दारू जप्त तसेच हातभट्टीची मोहफुलांची दारू जवळ बाळगून विक्री करणारा आरोपी नामे विनोद मधुजी उईके राय वय ४४ वर्ष रा. तुमडी ता. जि. नागपुर,याचे विरूध्द १ गुन्हा नोंद व त्याचे जवळून रू. १०००/— ची मोहफुलांची गावठी दारू जप्त.

**(नमुद कारवाईत एकुण १) १० लिटर मोहाफुल गावठी दारू २) ७,५६० मिली देशी/विदेशी दारू व इतर साहित्य असा एकुण ८,५६०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आला तसेच नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.)**

**मा. पोलीस अधिक्षक**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**
**यांच्या मान्यतेने**